# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय**
**रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट क्रमांक :- ३/२२** **दिनांक :- ०३/०१/२०२२**

## राष्ट्रीय महामार्गावर कॉपरने भरलेल्या ट्रकवर दरोडा टाकणा-या टोळीला गुन्हे शाखा कक्ष -3 कडुन शिताफीने अटक.

फिर्यादी नामे - श्री. मुकेशकुमार बाबुलाल सरोज वय- २६ वर्षे धंदा- ड्रायव्हर रा. मु सराय-रजाई अकारी पट्टी ता. पट्टी पो. ठाणे- कोंडोर जि. प्रतापगड उत्तरप्रदेश राज्य हे त्यांचे ताब्यातील टाटा कंपनीचा ट्रक क्र. एमएच ०४ ईवाय- ०४७८ लाल रंगाचा टरबो १६१३ मॉडेलचा हा दिनांक ३०/१२/२०२१ रोजी मुंबई अहमदाबाद हायवेने गुजरातकडे घेवून जात असतांना खानिवडा टोलनाक्याचे पुढे ५०० मिटर अंतरावर हवा चेक करणेकरीता रात्री २१.०० वाजता रोडचे बाजूस उभा केला असता, त्याचवेळी मारुती कारमधून ५ इसम आले, त्यातील ४ इसमांनी फिर्यादीस पकडून त्यांचे कारमध्ये जबरदस्तीने धमकावुन बसविले व एकाने फिर्यादीचा चालू स्थितीतील उभा असलेला ट्रक कॉपरच्या साहित्यासह ८४,०३,०००/- रुपये किंमतीचा ट्रक जबरदस्तीने मालासह घेवून गेले म्हणुन विरार पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि नंबर १३३२/२०२१ भा.द.वी.सं. कलम ३९५ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर गुन्हयाची गांभिर्याने दखल घेवुन गुन्हयातील आरोपीत यांचा शोध घेणे बाबत मा. वरिष्ठांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे गुन्हे शाखेचे अधिकारी अंमलदार यांनी सदर गुन्हयाचा समांतर तपास सुरु केला. तपासादरम्यान गोपणीय बातमीदार याचे मार्फतीने खात्रीशिर माहिती मिळवुन व तांत्रीक विश्लेषणाव्दारे आरोपीत नामे -१) मुदस्सर हिफजु रहेमान वय ३० वर्षे, रा. ता. मालेगाव, जि. नाशिक. २) अताउर रेहमान मोहमंद सिद्दीक वय ३९ वर्षे, रा. ता. मालेगाव, जि. नाशिक, ३) जावेद अहमद अब्दुल हजिज वय ३१ वर्षे, ता. मालेगाव, जि. नाशिक. ४) इजहार अहमद महमंद मुस्तफा वय ३६ वर्षे, रा. ता. मालेगाव, जि. नाशिक. ५) शेख सुलतान शेख मुनीर वय २४ वर्षे, रा. ता. मालेगाव जि. नाशिक ६) मोहम्मद राजु अहमद शेख वय- ३८ वर्षे, रा. भिवंडी, जि. ठाणे ७) मो. सादीक सदाफ मेहंदी हसन वय २७ वर्षे, प्रयागराज, राज्य उत्तर प्रदेश व ८) राशिद जव्वाद हुस्सेन फारुकी वय - ४३ वर्षे, भिवंडी, जि. ठाणे यांना ताब्यात घेवुन त्यांचेकडे गुन्हे अनुषंगाने तपास

केला असता त्यांचा सदर गुन्हयात सक्रिय सहभाग निष्पन्न झाल्याने त्यांना ताब्यात घेवुन पुढील कारवाई करीता विरार पोलीस ठाणे येथे हजर करण्यात आले असुन सदर आरोपीतांना अटक करून मा. न्यायालयात हजर केले असता त्यांना दिनांक ११/०१/२०२२ रोजी पावेतो पोलीस कोठडी देण्यात आलेली आहे.

वरील कामगिरी डॉ. श्री. महेश पाटील, पोलीस उप आयुक्त, (गुन्हे), श्री. अमोल मांडवे सहा. पोलीस आयुक्त, (गुन्हे), मि.भा.वि.व पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि. प्रमोद बडाख, पो.नि/ अविराज कुराडे, सपोनि/ कैलास तोकले, पोउपनिरी/ शिवाजी खाडे, पो.ना/ मनोज चव्हाण, पो.ना./सागर बारवकर, पो.ना/ मनोज सकपाळ, पो.ना/ सचिन घेरे, पो.ना/ मुकेश तटकरे, पो.ना/ शंकर शिंदे, पो.शि/ अश्विन पाटील, सर्व नेम- गुन्हे शाखा, तसेच पो.शि/ ७१ अमोल शिंदे नेम - मालेगाव शहर पोलीस ठाणे, नाशिक ग्रामिण यांनी उकृष्टरित्या पार पाडली आहे.